**जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बालकल्याण समित्या, त्यांचे कार्य व निधीची उपलब्धता.**

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्र.झेडपीई-१०/२००१/प्र.क्र.२०६/०५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ६ नोव्हेंबर, २००१.

**वाचा** :- १) शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीई-१०९२/ प्र.क्र.३१८/०५, दि.३.१२.१९९३.
२) शासन पत्र क्र.झेडपीई-१०९३/सीआर ४३९/०५, दि.२ सप्टेंबर, १९९३.
३) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीई-१०९४/ सीआर ९६६/०५, दि.१२ ऑगस्ट, १९९४.
४) शासन पत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीई-१०९३/ सीआर ४३९/०५, दि.१२.१०.१९९३.

Dy. C. E. O. (C.W.)

**प्रस्तावना** :-

महिला व बालविकासाशी संबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे व्हावी या उद्देशाने शासनाने दि.२४.४.१९९२ रोजी महाराष्ट्र अधिनियम-४/१९९२ अन्वये सर्व जिल्हा परिषदांमध्ये एका नविन महिला व बालकल्याण समितीची स्थापना केली आहे. सदर समिती ही वैधानिक स्वरुपाची समिती असल्याने जिल्हा परिषदांमधील इतर विषय समित्यांसारखेच या समितीला अधिकार आहेत. या समितीचे कार्ये व निधी उपलब्धतेबाबत या विभागाने वेळोवेळी सूचना दिल्या असल्या तरी राज्यातील जिल्हा परिषदा दरवर्षी त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून किमान १० टक्के रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिला व बालविकासासाठी राबविण्यात येणा-या योजनांसाठी अर्थसंकल्पित करीत नसल्याने अनुशेषाच्या रक्कमेत दरवर्षी भर पडत आहे. शासनाच्या सूचनांचे पालन जिल्हा परिषदा कडून योग्यरितीने होत नसल्याने जिल्हा परिषदांना याप्रकरणी पुन्हा सूचना देण्याची आवश्यकता विधान मंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीने प्रतिपादिली आहे. विधान मंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या शिफारशींसी शासन



महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, जळगांव.
आ. क्र. :-
दिनांक :-
दप्तर नं. :-
विभाग प्रमुखाचो स्वाक्षरी.

सहमत आहे. त्यासाठी या संदर्भात शासनाने दिलेल्या सूचनांचे एकत्रिकरण करुन अद्ययावत व सर्वसमावेषक आदेश काढणे जरुरीचे असल्याने प्रस्तूत प्रकरणी शासनाने महिला व बालविकासासाठी आजतागायत दिलेल्या सर्व सूचना / आदेश योग्य अंमलबजावणीसाठी पुन्हा सर्व जिल्हा परिषदांच्या निदर्शनास आणण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

शा.नि.ग्रा.वि.व ज.सं. क्र.झेडपीई-१०९ ३१८/०५, दि.३.९

महिला व बालविकासा संबंधित कार्यक्रमाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करावी या उद्देशाने शासनाने दि.२४.४.१९९२ रोजी महिला व बालकल्याण समितीची स्थापना केली असून, जिल्हा परिषदेच्या इतर समित्यांप्रमाणेच ही समिती वैधानिक स्वरुपाची आहे. जिल्हा परिषदेच्या अन्य समित्यांप्रमाणेच या समितीला अधिकार आहेत. शासनाने या समितीकडे दि.९.९.१९९२ रोजी खाली नमूद केलेल्या योजना अंमलबजावणीसाठी सोपविल्या आहेत :-

१) एकात्मिक बालविकास सेवा योजना
२) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली (४० टक्के महिला कार्यक्रम)
३) महिला व बालके यांचा विकास कार्यक्रम (डवाक्रा)
४) ट्रायसेम योजना (महिला कार्यक्रम)
५) समाजकल्याण खात्याची शिवणकला योजना
६) शिक्षण खात्याच्या बालवाडया

शासन पत्र ग्रा.वि.व ज. सं.वि.क्र.झेडपीई-१०९ /सीआर ४३९/०५, दि.२ सप्टेंबर,१९९३.

वरील सहा योजनांशिवाय सोबतचे विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या आणखी वेगळया २४ योजनां नव्याने तयार करुन दि.१२.१०.१९९३ चे पत्र क्र.झेडपीई १०९३/सीआर ४३९/०५ अन्वये महिला व बालकल्याण समितीकडे सोपविण्यात आल्या आहेत.

याशिवाय सदर यादितील कालबाहय योजना वगळून समितीस महिला व बाल विकासासाठी आणखी काही वेगळया योजना चालू करावयाच्या असतील तर आयुक्त, महिला व बालविकास संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या मान्यतेने अशा योजना समिती सुरु करु शकते.

२. महिला व बालकल्याण समितीसाठी जिल्हा परिषदेने त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातून किमान १० टक्के रक्कम उपलब्ध करुन द्यावी अशा सूचना यापूर्वीच सर्व जिल्हा

(५) (८८)

परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना देण्यात आल्या आहेत. त्याशिवाय जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या तरतुदीतून प्रतिवर्षी रूपये १० लाख प्रमाणे (१९९४-९५ पासून २० लाख रुपयेप्रमाणे ) अनुदान सदर समितीस उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेतला आहे.

ग्रा.नि.ग्रा.वि.व ज.सं. क्र.झेडपीई-१०९२/सीआर ३२८/०५, दि.३.१

३. महिला व बालकांशी संबंधित कार्यक्रमाचे राज्यस्तरावरुन चांगल्याप्रकारे नियोजन व अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने राज्यस्तरावर मंत्रालयात महिला व बालविकास विभाग असा एक स्वतंत्र विभाग स्थापन केलेला असून महिला व बालकांशी संबंधित बहुतांशी कार्यक्रम यापूर्वीच त्या विभागाकडे वर्ग झालेले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीसाठी प्रति जिल्हा परिषद रूपये १० / - लाख प्रमाणे (१९९४-९५ पासून २० लाख रुपये) जिल्हा नियोजन व विकास मंडळातून आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देण्याची कार्यवाहीसुध्दा महिला व बाल विकास विभागाने करावी असा शासन निर्णय आहे. सदर निर्णयानुसार महिला व बालविकास विभागाने सदर अनुदानासाठी वित्त विभागाच्या सल्ल्याने वेगळे लेखाशिर्ष उघडावे व आवश्यक ती तरतूद उपलब्ध करुन घ्यावी असेही आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

शासन पत्र ग्रा.वि.व ज. सं.वि.क्र.झेडपीई-१०९३ /सीआर ४३९/०५, दि.२ सप्टेंबर,१९९३.

४. जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीला जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून ५ ते १० टक्के पर्यन्त परंतु किमान ५ टक्क्यांपेक्षा कमी नाही इतकी रक्कम या समितीकडे सोपविण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता उपलब्ध करुन द्यावी अशा सूचना शासन पत्र क्र.झेडपीई १०९२/सीआर-३६५/०४, दि.९.९.१९९२ अन्वये सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना दिल्या होत्या. तथापि, यानंतर आणखी काही योजना या समितीकडे सोपविल्या असल्याने समितीकडे सोपविलेल्या योजनांचे स्वरूप लक्षात घेता जिल्हा परिषदेने स्वतःच्या निधीतून यासाठी ५ टक्के रक्कम देणे पुरेसे ठरणार नाही, त्यामुळे या समितीला किमान १० टक्के रक्कम जिल्हा परिषदेच्या निधीमधून उपलब्ध करुन देणे आवश्यक होते म्हणून सर्व जिल्हा परिषदांनी त्यांच्या उत्पन्नातून १० टक्के एवढी रक्कम प्रतिवर्षी सदर समितीस उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी असे शासनाने निदेश दिले होते. जिल्हा परिषदांनी खालील

बाबीपासून त्यांना मिळणारे उत्पन्न १० टक्के रक्कमेसाठी विचारात घ्यावे असेही निदेश शासनाने दिले आहेत.

१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ चे कलम १५७ खाली जिल्हा परिषदेने बसविलेले कर व शुल्क.

२) सदर अधिनियमाच्या कलम १५५ (१) खाली जमिन महसूलावरील उपकरात होणारी वाढ.

३) सदर अधिनियमाच्या कलम १५५ (२) अन्वये पंचायत समित्यांनी सूचविलेली जमिन महसूलावरील उपकरात होणारी वाढ.

४) सदर अधिनियमाच्या कलम १४४, १५१ व १५२ खाली बसविलेला जमिन महसूलावरील उपकर.

५) उपकर सापेक्ष अनुदान.

६) सदर अधिनियमाच्या कलम १५८ (३) खाली मिळणारे मुद्रांक शुल्क अनुदान.

७) सदर अधिनियमाच्या कलम १५० (२), १५१ ए (३) वा १५२ एक (३) अन्वये देय असलेले पाणीपट्टीवरील उपकरापासूनचे उत्पन्न.

५. शासनाने नुकतेच महिलांच्या विकासा संदर्भात नव्याने धोरण जाहीर केले आहे. शासनाने जाहीर केलेल्या या धोरणाप्रमाणे ग्रामपंचायतीच्या उत्पन्नापैकी १० टक्के उत्पन्न महिला व बालकांशी संबंधित कार्यक्रमावर खर्च व्हावेत असे अपेक्षित आहे. या शिफारसीचा विचार करुन शासनाने असा निर्णय घेतलेला आहे की, महिला व बालविकासाशी संबंधित कार्यक्रमावर जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निधीमधूनसुध्दा १० टक्के रक्कम खर्च करण्यात यावी. यास्तव जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना अशा सूचना देण्यात आल्या होत्या की, त्यांनी खालील बाबीपासून पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना मिळणा-या एकूण उत्पन्नाच्या किमान १० टक्के रक्कम महिला व बालकांशी संबंधित कार्यक्रमावर खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

ग्रा.वि.व
ज.सं.वि.शा.नि.
क्र.झेडपीई-१०९४/
सीआर ९६६/०५,
दि.१२ ऑगस्ट, १९

**अ) पंचायत समिती**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १५५ (१) व १५५ (२) अन्वये पंचायत समित्यांना मिळणा-या जमिन महसूलावरील उपकर

२. स्थानिक उपकर सापेक्ष अनुदान

**ब) ग्राम पंचायत**

१. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १३१ (१) अन्वये ग्रामपंचायतीना मिळणारे जमिन महसूल अनुदान.

२. उक्त अधिनियमातील कलम १३२ (अ) अन्वये ग्रामपंचायतींना मिळणारे जमिन समानीकरण अनुदान.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १२७ अन्वये ग्रामपंचायतीला मिळणारे उपकर अनुदान.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १५८ अन्वये ग्रामपंचायतीला मिळणारे मुद्रांक शुल्क.

ग्रा.वि.व ज.सं.वि.शा.नि. क्र.झेडपीई-१०९४/ सीआर ९६६/०५, दि.१२ ऑगस्ट, १९

६. महाराष्ट्र विधान मंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीकडून सन २०००-२००१ च्या तिस-या अहवालाद्वारे शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेने दरवर्षी स्वतःच्या उत्पन्नातून किमान १० टक्के रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या व बालकांच्या विकासासाठी योजना राबविण्यासाठी उपलब्ध करुन दयावी या सूचनांचे पालन होत नाही. जिल्हा परिषदांकडून यासाठी स्व-उत्पन्नातून १० टक्केपेक्षा कमी रक्कमेची तरतूद करण्यात येत असल्याने शासनाच्या सूचनांची अंमलबजावणी होत नाही परिणामतः महिला व बाल विकास योजनांसाठी आवश्यक निधींच्या अनुशेषाच्या रक्कमेत दरवर्षी भर पडत आहे.

या सर्व बाबी विचारात घेऊन सध्या महिला व बाल विकास समितीकडे विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या ज्या २४ योजना सोपविल्या आहेत त्यातील कालबाहय योजना वगळून कालानुरूप नविन योजना सुरू कराव्यात तसेच समितीने केलेल्या शिफारशीनुसार

सर्व जिल्हा परिषदांना पुन्हा एकदा अशा सूचना देण्यात येत आहेत की, शासनाने स्वीकारलेल्या महिला धोरण-२००१ नुसार तीनही स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांनी यापुढे स्व-उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम त्यांचे क्षेत्रातील महिला व बाल विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी खर्च करणे अनिवार्य आहे याची नोंद घ्यावी मात्र या रक्कमे मधील सर्व निधी जर त्या त्या वर्षी खर्च झाला नाही तर खर्च न झालेला शिल्लक निधी या योजनासाठीचा अनुशेष म्हणून पुढील आर्थिक वर्षाच्या तरतूदीत समाविष्ट करण्यात यावा व त्यानुसार अनुशेष धरून पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतुद करावी.

या आदेशांची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( कुंदा गोसावी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग, नविन प्रशासकिय भवन, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
संचालक, महिला व बालविकास, पुणे,
संचालक, एकात्मिक बालविकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मुख्यमंत्र्यांचे सचिवालय,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
ग्राम विकास व जलसंधारण विभागाची सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्या.०५, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

प्रत

१) सचिव, महिलांचे हक्क व कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
२) सचिव, पंचायत राज समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई यांजकडे माहिती साठी रवाना.

## विवरणपत्र "अ"

**(१) महिला व बाल कल्याण समिती मार्फत राबविण्यात यावयाच्या योजना :-**

लांब पल्ल्याच्या ( २ कि.मी.अंतरावरील ) शाळेत जाणा-या मुलींसाठी

( इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत शिकणा-या ) सायकली पुरविणे.

दुर्गम भागांत किंवा इतर ठिकाणी विद्यार्थ्यीनींना त्याच्या राहत्या गांवापासून ज्या ठिकाणी कमीत कमी २ कि.मी.अंतर चालत जावे लागते, अशा विद्यार्थ्यीनींना मोफत सायकली पुरविण्याबाबतची ही योजना आहे. सदर योजना दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यीनींना लाभ देण्याची योजना आहे. ही योजना नव्याने सुरु करावयाची आहे. या योजनेखाली किती लाभार्थ्यींना लाभ द्यावा याबाबतचा निर्णय जिल्हा परिषदेने ( आता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थानी ) घ्यावयाचा आहे.

**(२) ज्या भागांत बालवाडया/अंगणवाडया नाहीत, त्या ठिकाणी नवीन बालवाडया सुरु करणे :-**

ज्या प्रकल्पामध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविली जात नाही, तसेच ज्या ठिकाणी शिक्षण खात्याच्या बालवाडया नाहीत, त्या ठिकाणी महिला व बाल कल्याण समितीमार्फत बालवाडया सुरु करण्याबाबतची ही योजना आहे. प्राथमिक शिक्षण व बालकांना आरोग्याच्या चांगल्या सवयी व सुसंस्कार घडवून आणण्यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे. सदर बालवाडया ग्रामपंचायतीमार्फत राबविल्या जातील व बालवाडया चालविण्यासाठी प्रत्येकी एका वर्षी एक रक्कमी रुपये १,०००/- चे अनुदान देण्यात येईल. बालवाडीमध्ये किमान ४० पेक्षा जास्त बालके असतील, अशाच ठिकाणी त्या सुरु करण्यात येतील. ही नव्याने सुरु करावयाची योजना आहे. सदर बालवाडया कोणत्या संस्थेमार्फत चालवाव्यात, याबद्दल स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावयाचा आहे.

(३) **ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशिन खरेदी करणे:-**

केंद्र पुरस्कृत एमात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली दारिद्रय रेषेखालील महिलांना शिलाई मशिन देण्याची तरतूद आहे. तसेच समाज कल्याण विभागामार्फत देखील शिलाई मशिन पुरविण्यासाची तरतूद आहे. या दोन्ही योजनांचे नियंत्रण या समितीकडे देण्यात येत आहे. तसेच समितीला स्वतःच्या निधीतून देखील शिलाई मशिन खरेदी करता येतील. व यासाठी लाभार्थी कसे व किती निवडावेत याबद्दल जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावयाचा आहे.

(४) **महिला मंडळातर्फे गावांत वाचनालय व प्रौढ शिक्षण शिबीरे :-**

नोंदणीकृत महिला मंडळामार्फत ग्रामीण भागातील महिलांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करुन जनजागृतीचे काम करणे, गावामध्ये वाचनालये, प्रौढ शिक्षण वर्ग शिबीरे व मेळावे घेण्याची ही योजना आहे. सदर योजना ही नवीन योजना असून तिचे नियंत्रण या समितीकडे देण्यात यावे. यासाठी किती खर्च करावा तसेच कोणत्या महिला मंडळाची निवड करावी याबाबत जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) निर्णय घ्यावयाचा आहे.

(५) **ग्रामीण महिला व बाल-कल्याण रोग निदान शिबीराचे आयोजन :-**

० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांच्या आरोग्याची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करुन घेणे व आवश्यक असलेले औषधोपचार करणे, यासाठी रोगनिदान शिबीरे आयोजित करण्याची ही नवीन योजना आहे. ज्या ठिकाणी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अशा प्रकारची योजना उपलब्ध नसेल किंवा उपलब्ध असलेली योजना राबविण्यासाठी पैशाची कमतरता असेल, त्या ठिकाणी या समितीमार्फत ही योजना घेण्यात यावी. या योजनेवर किती खर्च करावा याबद्दल निर्णय जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) घ्यावयाचा आहे.

(६) **ग्रामीण भागातील महिलांसाठी सुलभ शौचालये बांधणे :-**

केंद्र पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाखाली एखादया गावांत वैयक्तिक शौचालये बांधणे शक्य नसेल तेथेच प्रायोगिक तत्वावर केवळ स्त्रियांकरीताच सामुदायीक शौचालयाची मागणी आल्यास आणि ग्रामपंचायतीने त्यासाठी जागा उपलब्ध करुन दिल्यास व देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी आणि त्याच्या हिश्श्याच्या खर्चाची जबाबदारी घेतल्यास, अशा प्रकारची सामुदायिक स्वच्छता गृहे बांधण्याची तरतूद आहे व अशा स्वच्छता गृहांवर केंद्र, राज्य, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांनी ३५ %, ३४ %, व ३० %, या प्रमाणात खर्च सोसावयाचा आहे. सदर योजना जिल्हापरिषदेमार्फत राबिवली जात असून तीचे नियंत्रण या समितीकडे देण्यात यावे. त्याशिवाय या समितीस स्वतःच्या निधीतून सदर कामे घेता येतील व त्यासाठी किती खर्च करावा व कोणत्या गावातील कामांची निवड करावी , या संदर्भात जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावयाचा आहे.

(७) महिला व बालकल्याण समितीमार्फत चालविण्यात येणा-या बालवाडयातील विद्यार्थ्यासाठी आवश्यक ते शैक्षणिक व खेळाचे साहित्य सदर समितीस खरेदी करता येतील. मात्र सदर योजनेवर किती खर्च करावा व कोणत्या बालवाडयांची निवड करावी याबाबत जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावयाचा आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या / चालू असलेल्या बालवाडयांवर खर्च करणे आवश्यक वाटत असेल तर असा खर्च समितीस करता येईल.

(८) **आदर्श आंगणवाडी / बालवाडी सेविकांना पुरस्कार :-**

अंगणवाडी व बालवाडीमध्ये उत्कृष्ठ काम करणा-या सेविकांना समितीस स्वतःच्या निधीमधून पुरस्कार देता येईल व उत्कृष्ट काम करणा-या सेविकांची निवड तसेच पुरस्काराची रक्कम किती असावी याबद्दल जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे.

(९) **अंगणवाडी /बालवाडींना साहित्य पुरविणे :-**

एकात्मिक बाल विकास योजनेखाली अंगणवाडीना लागणा-या साहित्याची खरेदी सदर समितीने करावी. त्यासाठी एकात्मिक बाल विकास योजनेमधून खर्च करावा. तथापि,

५८

ज्या अंगणवाडया /बालवाडया समिती स्वतःच्या निधीमधून चालविल त्यावरील खर्च समितीने स्वतःच्या निधीमधून करावा.

(१०) **ग्राम पातळीवरील बालकांच्या/महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहनासाठी स्पर्धा आयोजित करणे :-**

विविध क्षेत्रामध्ये बालकांच्या व महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रोत्साहनात्मक स्पर्धा या योजनेखाली समितीला आयोजित करता येतील सदर योजनेखाली प्रतिवर्षी कोणकोणत्या स्पर्धा आयोजित कराव्यात. किती स्पर्धा आयोजित कराव्यात व यावर प्रतिवर्षी किती खर्च येईल याबाबत जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावा.

(११) **महिला लोकप्रतिनिधींना पंचायत राज संस्थेबाबतचे प्रशिक्षण :-**

सदर योजनेखाली जिल्हा परिषदा, पचांयत समित्या , ग्रामपंचायती यामध्ये निवडून आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना पंचायत राज संस्थेबाबतचे प्रशिक्षण ग्राम पातळीवर, तालुका पातळीवर व जिल्हा पातळीवर आयोजित करावे. प्रतिवर्षी अशाप्रकारे किती प्रशिक्षण वर्ग आयोजित करावेत व यासाठी प्रतिवर्षी किती खर्च करावा याबाबत जिल्हा परिषदेने निर्णय घ्यावयाचा आहे.

(१२) **महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल :-**

समितीस स्वतःच्या निधीमधून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल या योजनेखाली आयोजित करता येईल. या योजनेवर प्रतिवर्षी रुपये १२,०००/- पर्यंत खर्च करण्यात यावा व प्रतिवर्षी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद मिळून एकत्रित सहल आयोजित करावी. अशी सहल फक्त वर्षातून एकदाच आयोजित करावी.

(१३) **अपंग, मुले व स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे/त्यांचे पुनर्वसन करणे :-**

ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे, अशा दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील अपंग, मुले, मुली व स्त्रियांना कृत्रिम अवयव बसविणे अत्यंत निकडीचे असल्यास समितीस यासाठी स्वतःच्या निधीतून खर्च करता येईल. सदर

योजनेखाली लाभार्थ्यांची निवड तसेच यासाठी प्रतिवर्षी किती खर्च करावा याबद्दल जिल्हा परिषदेन (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) निर्णय घ्यावा.

(१४) **गणवेश वाटप करण्याची योजना :-**

इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या मुलींना गणवेश वाटप करण्याची ही योजना आहे. सर्वसाधारणपणे ज्या मुलींची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशा मुलींना गणवेशाचे वाटप करता येईल. तथापि, सदर कार्यक्रमाखाली प्रतिवर्षी किती मुलींना गणवेश वाटप करता येईल. तसेच कोणत्या शाळेतील मुलींना गणवेशाचे वाटप करावे, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थानी निर्णय घ्यावयाचा आहे.

(१५) **आर्थिक दृष्टया गरीब महिलांना साडया पुरविणे :-**

ज्या महिलांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे, अशा महिलांना सदर समिती या योजनेखाली साडया उपलब्ध करुन देऊ शकेल. तथापि अशा महिलाची निवड कशी करावी तसेच सदर महिला कोणत्या गावातील व कोणत्या तालुक्यातील असाव्यात तसेच एकूण किती महिलांची निवड करावी, तसेच या योजनेवर प्रतिवर्षी किती खर्च करावा, याबाबत जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावा.

(१६) **गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी गाय, म्हैस, बकरी, कोंबडी इत्यादी खरेदी साठी मदत :-**

आर्थिक दृष्टया कमकूवत घटकांतील महिलांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी त्यांना स्वयंरोजगार मिळण्याच्या दृष्टीने या योजनेखाली उत्पादक साधन म्हणून गाय, म्हैस, बकरी, कोंबडी इत्यादी खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य करता येईल. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाखाली अशा मत्ता खरेदी करतांना जे आर्थिक निकष लावण्यात आलेले आहेत तेच निकष यासाठी लावण्यात यावेत. तथापि, लाभार्थी निवडतांना मात्र मागासवर्गीय किंवा बिगर मागासवर्गीय असा भेदभाव करु नये. थोडक्यात या योजनेचा लाभ सर्व महिलांना द्यावा. मात्र सदर योजनेखाली लाभार्थी कसे

निवडावेत, किती निवडावेत व वर्षाकाठी या योजनेवर किती खर्च करावा याचा निर्णय जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) घ्यावा.

(१७) **गरीब मुलींच्या लग्नासाठी अर्थसहाय्य (रु. २०००/- पर्यंत) :-**

आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील महिलांना लग्नासाठी प्रत्येकी रु. २०००/- पर्यंत अर्थसहाय्य करता येईल. सदर योजनेखाली लाभार्थीची निवड कशी करावी व किती लाभार्थी वर्षासाठी निवडावेत व या योजनेवर किती खर्च करावा याबाबतचा निर्णय जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) घ्यावा.

(१८) **महिला मंडळ/स्वयंसेवी संस्थाना उद्योगधंदयातील प्रशिक्षणासाठी अनुदान :-**

जिल्हयामध्ये अस्तीत्वात असलेल्या महिला मंडळ व स्वयंसेवी नोंदणीकृत संस्थांना ग्रामीण उद्योगधंदयातील प्रशिक्षणासाठी अनुदान या योजनेखाली देता येईल. नोंदणीकृत महिला मंडळ व स्वयंसेवी संस्थांची निवड जिल्हा परिषदेने करावी. वर्षासाठी अशा किती स्वयंसेवी संस्थांना किंवा महिला मंडळाना मदत करता येईल, तसेच किती रुपये पर्यंत मदत करता येईल व वर्षाकाठी एकूण किती खर्च करावा याचा निर्णय जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) घ्यावा.

(१९) **आर्थिकदृष्टया गरीब मुलींना तांत्रिक प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत :-**

आर्थिकदृष्टया गरीब मुलींना तांत्रिक व्यवसायासाठी प्रशिक्षण या योजनेखाली देता येईल व त्यासाठी समितीस अशा मुलींना आर्थिक सहाय्य करता येईल. प्रशिक्षणासाठी खर्च हा त्या व्यवसायावर अवलंबून राहील. अशा प्रशिक्षणासाठी कोणते व्यवसाय निवडावेत व या प्रशिक्षणासाठी किती मुली निवडाव्यात व प्रत्येकी किती रु. पर्यंत अनुदान दयावे तसेच या योजनेखाली वर्षाकाठी एकूण किती खर्च करावा याबाबत जिल्हा परिषदेने (आणि पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी) निर्णय घ्यावा.

(२०) **आर्थिकदृष्टया गरीब स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर :-**

नोकरी करणा-या किंवा शेतावर कामासाठी जाणा-या स्त्रियांच्या लहान मुलांसाठी या योजनेखाली पाळणाघर उपलब्ध करुन देता येईल. सदर पाळणाघर चालविण्यासाठी

जिल्हा परिषदेने योग्य अशा स्वयंसेवी संस्थांची निवड करुन, त्यांच्या खर्चासाठी अनुदान द्यावे. मात्र यासाठी किती अनुदान द्यावे. याबाबत जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावा. तसेच लाभार्थींची निवड देखील जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) करावी.

(२१) **आर्थिक दृष्टया गरीब स्त्रियांना संसारोपयोगी साहित्य पुरविणे :-**

सदर योजनेखाली आर्थिक दृष्टया कमकुवत घटकातील स्त्रियांना संसारोपयोगी रुपये २०००/- पर्यंतचे साहित्य समितीस पुरविता येईल. तथापि, अशा गरजू स्त्रियांची निवड जिल्हा परिषदेने स्वतः करावी. सदर रु. २०००/- रोख न देता त्यांना भांडी-कुंडी इत्यादी संसारोपयोगी साहित्यात द्यावी.

(२२) **जिल्हयाबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरु मुलांसाठी एक रक्कमी अर्थसहाय्य :-**

आर्थिक दृष्टया कमकुवत घटकातील जिल्हयाबाहेर उच्च शिक्षण घेणाऱ्या होतकरु मुलांना रु. २०००/- पर्यंत एक रक्कमी अर्थसहाय्य या योजनेखाली करता येईल. सदर मदत वस्तु स्वरुपात न देता रोख रक्कमेच्या स्वरुपात द्यावी. अशा होतकरु मुलांची निवड कशी करावी व प्रतिवर्षी अशा किती मुलांची निवड करावी याबाबत जिल्हा परिषदेने ( पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावा.

(२३) **विधवा, परित्यक्ता, आर्थिक दुर्बल स्त्रियांना शेती अवजारे खरेदीसाठी अर्थसहाय :-**

सदर योजनेखाली विधवा, परित्यक्ता व आर्थिक दुर्बल घटकातील स्त्रियांना शेती उपयोगी अवजारे खरेदी करता येतील. सदर अवजारे खरेदी करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम जिल्हा परिषदेने लाभार्थींना द्यावी. मात्र अशा लाभार्थींची निवड वर्षासाठी कशी करता येईल व यावर एकूण किती खर्च करावा याबाबत जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) निर्णय घ्यावा. सदर योजनेवर अर्थसहाय्य रोख स्वरुपात न देता वस्तू स्वरुपात द्यावे.

(२४) <u>**निराश्रीत महिलांना घरकुलांसाठी मदत :-**</u>

ज्या महिलांना कोणाचाच आधार नाही म्हणजे ज्यांच्या घरात त्या महिलाशिवाय कोणीही नाही, अशा असहाय्य महिलांना स्वतःचे घर नसल्यास, तिला घरकुलासाठी आर्थिक मदत करता येईल. या योजनेसाठी सर्वसाधारणपणे रु. ६०००/- पर्यंत आर्थिक मदत करावी. या योजनेखाली लाभार्थींची निवड जिल्हा परिषदेने (पंचायत समित्या व ग्राम पंचायत यांनी ) करावी. मात्र वर्षाकाठी अशा किती महिलांना लाभ द्यावा व या योजनेवर एकूण किती खर्च करावा याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांनी निर्णय घ्यावा.

---

जा.क्र. मबावि/विस्तार अधिकारी/आर आर/९८५/2009
महिला व बाल विकास विभाग
जिल्हा परिषद जळगांव
दिनांक 28/11/2009

प्रति,

1) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो. जि.प. जळगांव यांना माहितीस्तव सविनय सादर

2) मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी सो. जि.प. जळगांव यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर

D05/MYDOC/D05/CR-206

महिला व बाल विकास अधिकारी
जिल्हा परिषद, जळगांव